# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

## प्रकटन

**विषय – माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा, परीक्षागृहातील उपस्थितीबाबत...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा दरवर्षी आयोजित करण्यात येतात. सदर परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणाऱ्या आहेत. या परीक्षेत होणारे गैरप्रकार हे प्रामाणिक व मेहनती विद्यार्थ्यांच्या मनोबलाचे खच्चीकरण करतात. गतपरीक्षेत प्रश्नपत्रिका व्हायरल होण्याचे काही प्रकार निदर्शनास आल्याने त्याबाबत फौजदारी गुन्हे दाखल करावे लागले आहेत. परीक्षेत घडणाऱ्या अशा गैरप्रकारांना आळा घालण्याकरीता व उपाययोजना करण्याकरीता शासनाने समिती गठीत केली होती. सदर समितीने सुचविलेल्या शिफारशीस शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यातील तरतुदीनुसार प्रत्यक्ष परीक्षा सुरु झाल्यानंतर कोणत्याही परीक्षार्थ्यास परीक्षागृहात प्रवेश दिला जाणार नाही तसेच परीक्षा संपेपर्यंत कोणत्याही परीक्षार्थ्यास परीक्षागृहाबाहेर जाता येणार नाही असे मंडळाने जाहीर केले आहे.

प्रचलित पध्दतीनुसार परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना प्रथम सत्रासाठी सकाळी १०.३० वाजता परीक्षागृहात प्रवेश देण्यात येतो. सकाळी १०.४० वाजता उत्तरपत्रिकांचे वाटप होते व त्यावेळी विद्यार्थ्यांनी सूचना वाचून बैठक क्रमांक व इतर माहिती भरावयाची असते, सकाळी १०.५० वाजता म्हणजेच प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिकांचे वाटप होते. व त्यावेळी विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिकेचे वाचन करावयाचे असते व तद्नंतर सकाळी ११.०० वाजता प्रत्यक्ष उत्तरपत्रिका लिहिणेस सुरुवात होते. परीक्षा सुरु झाल्यानंतर अर्ध्या तासापर्यंत (सकाळी ११.३० पर्यंत) विद्यार्थ्यांना परीक्षागृहात प्रवेश देण्यात येत होता. मात्र उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे गैरप्रकार निदर्शनास येत असल्याने परीक्षागृहात उशिरा येण्यासाठीची जादाच्या ३० मिनिटांची सुविधा बंद केली आहे.

विद्यार्थ्यांना सकाळी १०.३० वाजता प्रवेश दिला जात असल्याने विद्यार्थ्यांने सकाळी १०.३० पर्यंत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. तथापि अर्धा तास उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना सकाळी ११.०० वाजेपर्यंत प्रवेश देण्यात यईल. तद्नंतर अतिशय अपवादात्मक परिस्थितीत प्रकरणपरत्वे निर्णय घेण्यात येईल.

परीक्षा सुरु झाल्यानंतर तातडीची कारणे, आपत्कालीन परिस्थिती सोडून विद्यार्थ्याला परीक्षागृहाबाहेर जाण्यास परवानगी नाही. मात्र अपवादात्मक परिस्थितीत जर विद्यार्थ्याला परीक्षागृहातून बाहेर जावयाचे असेल तर त्याच्याकडून प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका जमा करुन त्याला बाहेर सोडण्यात येईल. जर विद्यार्थ्यास प्रश्नपत्रिका हवी असेल तर परीक्षा संपल्यानंतर देण्यात येईल.

याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे -४११००४.

दिनांक – ०४/१२/२०१७

---

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

पत्र क्र. नाविमं/ पमा/ 5755
नागपूर, दिनांक : 12/12/17

प्रती

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/
कनिष्ठ महाविद्यालये,
नागपूर विभाग, नागपूर

माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा, परीक्षागृहातील उपस्थिबाबत उपरोक्त प्रकटन विद्यार्थी व शिक्षकांचे निर्दशास आणून द्यावे.

विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर